**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे








वर्ष ५ ▪ अंक २६४ ▪ सोमवार २० जुलै २०२६ ▪ पाने ४ ▪ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322


# गावठी कट्टे विक्रीसाठी आलेले दोन अट्टल गुन्हेगार जेरबंद

### एलसीबीच्या कारवाईत ५ गावठी कट्ट्यांसह अकरा लाखांचा मुद्देमाल जप्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** शेंडी बायपास परिसरात बेकायदेशीर शस्त्रांची विक्री करण्यासाठी आलेल्या दोन अट्टल गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे. पिंटू उर्फ भाऊ आनंदा रसाळ (वय ४०, रा. निघोज, ता. पारनेर) आणि बंटी उर्फ स्वप्निल बिभीषण पाबळे (वय ३०, रा. कावळ पिंपरी, ता. जुन्नर) अशी अटक आरोपींची नावे आहेत.

या कारवाईत ५ गावठी कट्टे, २ मोबाईल आणि एक स्कोडा कार असा एकूण १० लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. यावेळी गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, शेंडी बायपास रोडवर एका कारमध्ये दोघेजण अग्निशस्त्रांची विक्री करण्यासाठी थांबले आहेत. त्यानुसार पथकाने वडगाव गुप्ता शिवारात ▪ पान ४ वर

#### रसाळवर सहा गंभीर गुन्हे

भाऊ आनंदा रसाळ: याच्यावर पारनेर व शिरूर पोलीस ठाण्यात खून, खुनाचा प्रयत्न, दंगल आणि मोक्का अंतर्गत असे एकूण ६ गंभीर गुन्हे दाखल आहेत. तर फरार असलेला तिसरा आरोपी ऋषिकेश भोसले याच्यावरही पारनेर पोलीस ठाण्यात खून व खुनाच्या प्रयत्नाचे तीन गुन्हे दाखल आहेत. आरोपींनी एमआयडीसी पोलीस ठाण्यातील एका जुन्या गुन्ह्याचीही कबुली दिली आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार मनोज साखरे यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात आर्म अ‍ॅक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विद्यार्थी-युवकांच्या न्याय हक्कासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे निदर्शने

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** राज्यातील विद्यार्थी व युवकांच्या न्याय हक्कासाठी तसेच शैक्षणिक क्षेत्रातील कथित अनागोंदी कारभाराच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या अहिल्यानगर शहर व जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन प्रशासनाला देत सरकारने विद्यार्थी व युवकांच्या प्रश्नांकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील व देशातील लाखो विद्यार्थी आणि युवकांचे भविष्य धोक्यात आलेले असतानाही सरकार केवळ बघ्याची भूमिका घेत आहे. आजचा विद्यार्थी आणि युवक हा देशाचा भविष्यकाळ असूनही सरकारचे शैक्षणिक धोरण आणि युवकांच्या प्रश्नांबाबतचे धोरण अत्यंत उदासीन व निराशाजनक असल्याचा आरोप करण्यात आला.

स्पर्धा परीक्षांचे वारंवार फुटणारे पेपर, भरती प्रक्रियेतील कथित गैरव्यवहार, ऑनलाइन परीक्षा व्यवस्थेतील गंभीर त्रुटी, पोलीस भरतीतील उमेदवारांवर होत असलेला अन्याय आणि विद्यार्थी-युवकांच्या मूलभूत प्रश्नांकडे सरकारने केलेले दुर्लक्ष यामुळे राज्यभरात संतापाची लाट निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याऐवजी सरकार जबाबदारी झटकत असल्याची टीकाही करण्यात आली.

लोकशाही मार्गाने न्याय हक्कांसाठी आंदोलन करणारे प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ व पर्यावरणवादी सोनम वांगचूक यांच्या आंदोलनालाही सरकारकडून अपेक्षित सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. लोकशाहीत जनभावनांचा असा अनादर करणे चिंताजनक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच परीक्षा व्यवस्थेतील गोंधळ आणि मानसिक तणावामुळे देशात अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या असून, या पार्श्वभूमीवर नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. मात्र सरकारने अद्याप त्यांचा राजीनामा न घेतल्याने विद्यार्थी आणि युवकांच्या प्रश्नांबाबत सरकारची भूमिका संवेदनाहीन असल्याची भावना समाजात निर्माण झाली असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले.

या सर्व विद्यार्थीविरोधी व जनविरोधी धोरणांचा निषेध करत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. ▪ पान ४ वर

# दरोड्याच्या तयारीतील तिघांची टोळी एमडी ड्रग्जसह गजाआड

### तोफखाना पोलिसांच्या कारवाईत ३१ लाखांचे एमडी ड्रग्ज जप्त । दोघे फरार



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अमली पदार्थांची तस्करी आणि दरोड्याच्या तयारीत असलेल्या ३ आरोपींनारंगेहाथ तोफखाना पोलिसांनी अटक केली असून, त्यांच्याकडून ३१ लाख रुपये किमतीचे एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले आहे. त्यांचे दोन साथीदार पळून जाण्यात यशस्वी झाले. दि. १९ जुलै रोजी सायंकाळी तारकपूर व मिस्कीन मळा परिसरात गस्त घालत असताना पोलिसांना एका विनाक्रमांकाच्या पांढऱ्या स्विफ्ट कारमधून ५ संशयित फिरताना दिसले. पोलिसांनी विचारपूस करण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी पळ काढला. मात्र, पोलिसांनी पाठलाग करून तोफखाना पोलीस ठाण्यासमोर कार थांबवली. ▪ पान ४ वर

#### पोलिसांचे आवाहन

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि बालाजी वैद्य व त्यांच्या पथकाने केली. अमली पदार्थांविषयी काही माहिती असल्यास नागरिकांनी पोलिसांशी संपर्क साधावा, माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# देहरे दरोडा व अपहरण प्रकरणातील टोळीच्या एलसीबीने आवळल्या मुसक्या

### पाच मुख्य आरोपी अटकेत । फरार साथीदारांचा शोध सुरू

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत देहरे शिवारातील रेल्वे ब्रिजवर स्कॉर्पिओ गाडी अडवून मारहाण, तोडफोड आणि अपहरण करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी ५ मुख्य आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून उर्वरित फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

दिनांक १४ जुलै २०२६ रोजी शिर्डीहून दर्शन घेऊन परतणाऱ्या विशाल संपत पवार व त्यांच्या मित्रांना दोन वाहनांतून आलेल्या आरोपींनी अडवले. लाकडी दांडक्यांनी मारहाण करत गाडीचे नुकसान केले आणि पवार यांच्या मित्रांचे बळजबरीने अपहरण करून वेगवेगळ्या ठिकाणी सोडले. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अपहरण व दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि संतोष मुटकुळे व उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड यांच्या पथकाने तपास चक्रे फिरवली. शेंडी बायपास येथून पिंटू उर्फ भाऊ रसाळ आणि बंटी उर्फ स्वप्निल पाबळे यांना गावठी कट्ट्यासह ताब्यात घेतले.त्यांच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीनुसार पथकाने चास शिवारात सापळारचून भाऊसाहेब लंघे, हर्षद थोरात, जावेद काळे, मिनीनाथ वाघस्कर आणि जितेश सरडे यांना अटक केली. चौकशीदरम्यान आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. सचिन रसाळ, ऋषिकेश भोसले, समाधान भांबरे, राजेंद्र सोडे आणि प्रवीण रसाळ हे फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींना एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

### शिर्डीतील महीलेच्या खुनाची घटना वेदनादायी

# नगरपरिषदेच्या माध्यमातून कठोर भूमिका घेणार - उपनगराध्यक्ष अभय शेळके

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**शिर्डी–** शिर्डी शहरातील गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू असतानाच १९जुलै रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास साई मंदिराच्या परिसरात खाद्यपदार्थ विक्री करणारी महिला जयश्री साईनाथ श्रीरसागर वय २७ राहणार बाजारतळ शिर्डी या महीलेवर किरकोळ कारणावरून दोन मुलीनी खुनी हल्ला त्यात तिचा उपचारादरम्यान साईबाबा संस्थान रुग्णालयात झालेला मृत्यूची गंभीर दखल पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे डॉक्टर सुजय विखे पोलीस यंत्रणा व शिर्डी नगर परिषदेच्या माध्यमातून घेतली असून रोडवर बसून अशाप्रकारे व्यवसाय करणारी मंडळीना रोखण्यासाठी कठोर कारवाई बरोबर रात्री १० वाजेनंतर शिर्डीतील आस्थापना देखील बंद करण्यासाठी तात्काळ कारवाई करण्यात येणार असून त्याबरोबरच अवैध व्यवसायातील असलेली काही मंडळी त्याबरोबरच काही हॉटेलचा देह व्यापारासाठी होणारा वापर हे रोखण्यासाठी तातडीने नगर परिषदेच्या माध्यमातून नोटीस देखील बजावण्यात येणार असल्याचे सांगताना उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी सांगितले की रविवारी शिर्डीत झालेली घटना निंदनीय आहे महिलेने महिलेचा खून करणे विचार करावयास भाग पाडणारी घटना आहे आम्ही सर्व एकत्रित उपाय योजना करुन सर्व नगरसेवकांना बरोबर घेऊन असे प्रकार परत घडणार नाही याबाबत आराखडा करत असुन त्या बाबतीत तातडीने उपाययोजना करण्यात येणार असल्याचे नगराध्यक्ष जयश्री थोरात यांनी सांगितले.

यावेळी माजी नगराध्यक्ष अलकाताई शेजवळ नगरसेवक दीपक गोंदकर किरण बोराडे सतीश गोंदकर अमित शेळके बापु ठाकरे आदींसह नगरसेवक उपस्थित होते

उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी स्पष्ट भूमिका मांडताना सांगितले की हि साईची नगरी आहे क्राईम नगरी नाही शिर्डी शहरात कमी श्रमात जास्त पैसा मिळवणारी काही मंडळी असून अशांचा बंदोबस्त करण्यासाठी कठोर भूमिका घेणार असून व्यवसाय करणारी टिळा लावणारे अल्पवयीन मुले मुली ▪ पान ४ वर

# लोखंडी पूल व नवीन पुलावरील बंद स्ट्रीट लाईट्स तात्काळ सुरू करा

### प्रभाग १७ मधील पुलांवर अधिक प्रकाशमान एलईडी दिवे बसविण्याची आयुक्तांकडे नगरसेवक मयूर बांगरे यांची मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** प्रभाग क्रमांक १७ मधील अमरधामजवळील रेल्वे स्टेशन रोडवरील लोखंडी पूल तसेच त्यालगतच्या नवीन पुलावरील अनेक स्ट्रीट लाईट्स मागील काही दिवसांपासून बंद असल्याने परिसरात रात्री अंधाराचे साम्राज्य पसरत आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, बंद पडलेले दिवे तात्काळ सुरू करण्याबरोबरच अधिक प्रकाशमान एलईडी स्ट्रीट लाईट्स बसविण्याची मागणी नगरसेवक मयूर कन्हैयालाल बांगरे यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अमरधाम परिसरातील रेल्वे स्टेशन रोड हा शहरातील अत्यंत महत्त्वाचा आणि वर्दळीचा मार्ग आहे. या मार्गावरून रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या वाहनांसह भारतीय सैन्याच्या वाहनांची नियमित ये-जा होत असते. तसेच मालधक्का आणि ट्रान्सपोर्ट व्यवसायाशी संबंधित जड मालवाहू ट्रकांची वाहतूकही मोठ्या प्रमाणावर याच मार्गाने केली जाते. याशिवाय दुचाकी, चारचाकी वाहने तसेच पादचाऱ्यांची दिवसरात्र मोठ्या प्रमाणात वर्दळ असल्याने या मार्गाचे महत्त्व अधिक आहे.

मात्र, पुलावरील स्ट्रीट लाईट्स बंद असल्यामुळे रात्रीच्या वेळी संपूर्ण परिसर अंधारमय होत असून वाहनचालकांना मार्गक्रमण करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. अंधारामुळे अपघाताचा धोका वाढला असून नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांकडूनही याबाबत सातत्याने तक्रारी करण्यात येत असल्याचे निवेदनात नमूद ▪ पान ४ वर

# हातात लोखंडी कोयता घेवुन दहशत निर्माण करणारे आरोपीनां कोतवाली पोलीसांनी केले जेरबंद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी


(छाया : जाकीर शेख)

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरात हातात लोखंडी कोयते घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या दोन तरुणांच्या कोतवाली पोलिसांनी अवघ्या काही तासांत मुसक्या आवळल्या आहेत. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओची गंभीर दखल घेत पोलिसांनी तातडीने तपास सुरू करत आरोपींचा शोध घेत त्यांना जेरबंद केले.

रविवार दि. १९ जुलै रोजी पोलिसांनी आरोपी अमोल संजय चांदणे आणि प्रतीक बाळासाहेब पवार यांना ताब्यात घेत त्यांच्या ताब्यातील लोखंडी कोयता जप्त केला. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा रजिष्टर नंबर ६९१/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), ३५१ (१), ३८५ सह आर्म अ‍ॅक्ट कलम ३/२५ प्रमाणे संबंधित कलमांवये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावेळी पोलिसांनी आरोपींनी ज्या परिसरात कोयते फिरवत दहशत निर्माण केली होती त्याच परिसरातून त्यांची धिंड काढत नागरिकांमध्ये कायद्याचा धाक निर्माण केला.

कोतवाली पोलिसांच्या या कामगिरीचे अहिल्यानगर शहरामध्ये जोरदार कौतुक होत आहे. कारवाई ही मुम्मका सुदर्शन पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर, वैभव कलुबर्मे अपर पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर, माश्री दिलीप टिपरसे, उप विभागीय पोलीस अधिकारी अहिल्यानगर शहर उप विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नितीन देशमुख, पोलीस निरीक्षक कोतवाली, पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख, पोहेकॉ बाळक्रुष्ण दौड, बोरगे, विशाल दळवी, साबीर शेख, पोकॉ ▪ पान ४ वर

# जन्मठेपेची शिक्षा भोगून आलेल्या व्यक्तीकडून पुन्हा प्राणघातक हल्ला?; पैठणमध्ये खळबळ

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पैठण–** पैठण शहरातील मौलाना दर्गा परिसरात राहणाऱ्या जन्मठेपेची शिक्षा भोगून आलेल्या एका व्यक्तीने एका इसमावर कथितरित्या प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात संबंधित इसम गंभीर जखमी झाला असून, स्थानिक नागरिकांनी तत्काळ त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.

घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित व्यक्तीने यापूर्वीही दोन ते तीन वेळा नागरिकांवर हल्ले केल्याच्या घटना घडल्या होत्या. मात्र, त्याबाबत पोलिसांनी प्रभावी कारवाई केली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

या ताज्या घटनेनंतर परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, संबंधित व्यक्तीविरुद्ध कठोर कारवाई करून परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, या प्रकरणी पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात प्रक्रिया चालू आहे आरोपीला अटक करण्यात आली आहे , तसेच हल्ल्यामागील नेमके कारण काय, याबाबत अधिकृत माहिती मिळू शकलेली नाही. पोलिसांकडून घटनेचा पुढील तपास सुरू असल्याचे समजते.

## दै. आकर्षण निवडक

### देवगड देवस्थानच्या दिंडीचे पंढरपूर येथे प्रस्थान



अहिल्यानगर - महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर महाराज,संत तुकाराम महाराज यांनी सुरू केलेली वारीची परंपरा आजही मोठ्या उत्साहाने वारकरी आषाढी, कार्तिकी एकादशी निमित्त करीत असतात. मोठ्या भक्ती भावाने ऊन, वारा,पाऊस याची तमा न बाळगता वारकरी मजलदर मजल पायी चालत पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करत असतात.या दिंडीतील श्री विठ्ठलाच्या दर्शनाची ओढ लागलेली असते.भजन,कीर्तन, प्रवचन, नामस्मरण करत मोठ्या भक्ती भावाने दिंडीचा सोहळा साजरा होत असतो.दिंडीतील सर्वजण एकमेकांना माऊली म्हणून संबोधतात.या दिंडीतून वारकऱ्यांमध्ये भगवत भक्ती, देशप्रेम,एकोप्याची भावना निर्माण होते. असे निरूपण श्री क्षेत्र देवगड देवस्थान चे महंत भास्करगिरीजी महाराज यांनी केले आहे.सालाबाद प्रमाणे श्री क्षेत्र देवगड देवस्थानचे संत किसनगिरी बाबा पालखी सोहळा पंढरपूर येथे दर्शनासाठी जात असतात.अहिल्यानगर येथे आले असता सदगुरू किसनगिरी बाबा नगर भक्त मंडळाच्या वतीने श्री क्षेत्र देवगड देवस्थानचे महंत हभप भास्करगिरी महाराज यांचे स्वागत करण्यात आले.

### उडान फाउंडेशनचा १५ ऑगस्टला रंगणार सांस्कृतिक सोहळा

अहिल्यानगर - उडान फाउंडेशनच्या माध्यमातून १५ ऑगस्ट रोजी शहरातील टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात ८० व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सांस्कृतिक व विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये देशभक्तीवर गीते, देशभक्ती गीतांवरील नृत्य स्पर्धा, महाराष्ट्राची लोकधारा सादरीकरण अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचा समावेश आहे. या सोहळ्यात विविध क्षेत्रात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यावरण, साहित्य, संस्था, उद्योजक, क्रीडा, योगा आदींमध्ये हिरारीने सातत्याने परिश्रमपूर्वक कार्य करणाऱ्या व्यक्तींना आणि युवकांना राज्यस्तरीय उडान पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते गौरविले जाणार आहे. या पुरस्कारासाठी व्यक्ती परिचय, केलेल्या कार्याची माहिती, फोटो, वर्तमानपत्रातील कार्यक्रमाचे कात्रणे ३० जुलैपर्यंत प्रस्ताव स्वरुपात पाठविण्याचे आवाहन उडान फाउंडेशनच्या अध्यक्षा ॲड. आरती शिंदे यांनी केले आहे.

# खा.लंके यांच्या संकल्पनेतून मोफत वीज योजना संपर्क केंद्राचा शुभारंभ



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** सर्वसामान्य नागरिकांना केंद्र शासनाच्या पीएम सूर्य घर मोफत वीज योजना चा लाभ सुलभपणे मिळावा, सौरऊर्जेचा वापर ग्रामीण भागात अधिकाधिक वाढावा आणि वीजबिलाच्या वाढत्या खर्चातून नागरिकांना दिलासा मिळावा या उद्देशाने खासदार नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून पारनेर येथील त्यांच्या संपर्क कार्यालयात पीएम सूर्य घर मोफत वीज योजना संपर्क केंद्राचा भव्य शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या उपक्रमामुळे नागरिकांना योजनेची संपूर्ण माहिती, अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे तसेच सौरऊर्जा प्रणाली उभारणीबाबत मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत करण्यात येत आहे.

देशात स्वच्छ आणि हरित ऊर्जेला चालना देण्यासाठी केंद्र शासनाने सुरू केलेल्या पीएम सूर्य घर मोफत वीज योजना अंतर्गत घरांच्या छतावर सौरऊर्जा प्रणाली बसविण्यासाठी अनुदान दिले जात आहे. या योजनेचा लाभ ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबांपर्यंत प्रभावीपणे पोहोचावा, नागरिकांना शासकीय प्रक्रियेतील अडचणी दूर व्हाव्यात आणि सौरऊर्जेचा वापर वाढावा, यासाठी खासदार नीलेश लंके यांनी आपल्या संपर्क कार्यालयात स्वतंत्र मार्गदर्शन व सहाय्य केंद्र सुरू करण्याचा पुढाकार घेतला आहे.

या संपर्क केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना योजनेची पात्रता, ऑनलाइन नोंदणी, आवश्यक कागदपत्रे, अनुदानाची प्रक्रिया, सौर पॅनेल बसविण्याबाबत तांत्रिक माहिती तसेच शासनाच्या विविध नियमांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. त्यामुळे नागरिकांना विविध कार्यालयांचे हेलपाटे मारण्याची गरज भासणार नसून, एका ठिकाणी सर्व प्रकारचे मार्गदर्शन मिळणार आहे.

योजनेचा लाभ घेतल्यास नागरिकांच्या मासिक वीजबिलात मोठ्या प्रमाणात बचत होणार असून दीर्घकालीन दृष्टीने ऊर्जा खर्च कमी होण्यास मदत होईल. त्याचबरोबर पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबित्व कमी होऊन स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ऊर्जे चा वापर वाढण्यास हातभार लागणार आहे. हवामान बदल आणि वाढते प्रदूषण यांसारख्या जागतिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर सौरऊर्जेचा प्रसार हा काळाची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

शुभारंभ सोहळ्यास दीपक लंके, बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर, माजी संचालक मारुती रेपाळे, रा. या. औटी, सुदाम पवार, प्रा. संजय लाकुडझोडे, सचिन पठारे, कांतीलाल भोसले, संदीप भागवत, भिकाजी जगदाळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत ग्रामीण भागात सौरऊर्जेच्या वापराला गती देण्यासाठी अशा प्रकारच्या मार्गदर्शन केंद्रांची आवश्यकता असल्याचे सांगितले.

यावेळी उपस्थित नागरिकांना पीएम सूर्य घर मोफत वीज योजना चा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. प्रत्येक कुटुंबाने आपल्या घरावर सौरऊर्जा प्रणाली बसवून वीजबिलात बचत करावी, पर्यावरण संवर्धनात योगदान द्यावे आणि ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकावे, असे आवाहन करण्यात आले.

खासदार नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमामुळे पारनेर तालुक्यातील नागरिकांना शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेचा लाभ अधिक सुलभतेने मिळण्यास मदत होणार असून, स्वच्छ ऊर्जा समृद्ध भविष्य, प्रत्येक घर सौरऊर्जेकडे हा संदेश प्रत्यक्षात उतरविण्याच्या दिशेने हा उपक्रम महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# शिर्डीलासलगाव महामार्गावर चिखलाचा थर; टोमॅटोचा ट्रक पलटी, ५ हून अधिक अपघात

## देर्डे फाटा ते भरवस फाटा दरम्यान सुरू असलेल्या महामार्गाच्या कामामुळे रस्ता घसरडा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी –** शिर्डीला सलगाव महामार्गावरील देर्डे फाटा ते भरवस फाटा या दरम्यान सध्या महामार्गाचे काम सुरू आहे. मात्र, कामादरम्यान रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल साचल्याने वाहनचालकांसाठी हा मार्ग धोकादायक बनला आहे. आज (शनिवार) सायंकाळी झालेल्या रिमझिम पावसामुळे हा चिखल अधिकच घसरडा झाला आणि अवघ्या काही वेळात ५ हून अधिक लहान–मोठे अपघात घडले.

याच दरम्यान टोमॅटोच्या कॅरेटने भरलेला एक ट्रक घसरून पलटी झाला. अपघातामुळे महामार्गावर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. सुदैवाने या अपघातात जीवितहानी झाल्याची माहिती नसली, तरी वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

स्थानिक नागरिक व वाहनचालकांनी महामार्गाच्या कामातील निष्काळजीपणावर संताप व्यक्त करत, रस्त्यावर साचलेला चिखल तातडीने हटवून सुरक्षित वाहतुकीची व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे. पावसाळ्यात अशा प्रकारे रस्त्यावर चिखल साचत असल्याने भविष्यात आणखी मोठी दुर्घटना होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

# आता परिसरातच मुलींना उच्च शिक्षणाची मोफत संधी

## ढोरकीन येथे श्रीमती प्रभाताई सारूक महिला महाविद्यालयात प्रवेश सुरू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** ग्रामीण भागातील मुलींना उच्च शिक्षणासाठी दूरवर जावे लागू नये, या उद्देशाने ढोरकीन (बालानगर फाटा), ता. पैठण येथे सुरू झालेल्या श्रीमती प्रभाताई सारूक महिला कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी मोफत प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

सर्वसाक्षी एकता मंडळ, छत्रपती संभाजीनगर संचलित व एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई संलग्न असलेल्या या महाविद्यालयात बी.ए., बी.कॉम. आणि बी.एस्सी. पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश दिला जात आहे. इयत्ता १२ वी उत्तीर्ण विद्यार्थिनींना प्रवेशाची संधी उपलब्ध आहे.

विभाग, अनुभवी प्राध्यापक, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, खेळांची सुविधा तसेच मुलींसाठी सुरक्षित व शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यात आले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना गुणवत्तापूर्ण शिक्षण त्यांच्या परिसरातच मिळावे, यासाठी संस्था प्रयत्नशील असल्याचे व्यवस्थापनाने सांगितले. प्रवेशाबाबत अधिक माहितीसाठी इच्छुक विद्यार्थिनी व पालकांनी महाविद्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# विश्व युवा कौशल्य दिनानिमित्त के. जी. कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे कौशल्य प्रतिज्ञा कार्यक्रम उत्साहात संपन्न



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विश्व युवा कौशल्य दिनानिमित्त के. जी. कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स येथे विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास, रोजगारक्षमता आणि आत्मनिर्भरतेची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने कौशल्य प्रतिज्ञा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना आजच्या स्पर्धात्मक युगात शैक्षणिक ज्ञानाबरोबरच संवादकौशल्य, डिजिटल कौशल्य, नेतृत्व, उद्योजकता आणि व्यक्तिमत्त्व विकास यांचे महत्त्व सांगण्यात आले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी आयुष्यभर सातत्याने नवीन कौशल्ये आत्मसात करण्याची, तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करण्याची, प्रामाणिकपणे कार्य करण्याची आणि समाजाच्या प्रगतीसाठी आपल्या कौशल्यांचा उपयोग करण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली.

एक विद्यार्थी एक कौशल्य हा संकल्प स्वीकारत प्रत्येक विद्यार्थ्याने आगामी तीन महिन्यांत किमान एक नवीन कौशल्य विकसित करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त संचालक श्री. किशोर मुनोत तसेच महाविद्यालयाच्या कॅम्पस संचालक प्रा. डॉ. स्वाती मुनोत प्रमुख उपस्थित होते. तसेच डॉ. वर्षा किर्तने, डॉ. प्रशांत खोपटीकर, श्री. संतोष मुनोत, प्रा. स्नेहल बोरावके, प्रा. योगेश चाकवते,प्रा. रोहिणी क्षीरसागर आणि सौ. हर्षाली रासकर यांची विशेष उपस्थिती लाभली.

महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षण, स्वयंरोजगार आणि रोजगाराभिमुख उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमास प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी उत्स्फूर्तपणे उपस्थित होते.



आज घर संसार शॉपी चे उद्योजक निखिल उपाध्ये व द्वारकासिंह लस्सी चे उद्योजक.सुनील राजपूत यांनी पोलिस निरीक्षक श्री.बालाजी वैद्य यानी अहिल्यानगर तोफखाना पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक पदभार स्विकारायला बदल यांचा स्वागत करण्यात आले.



आज सोमवार दि २० रोजी पी.ए. इनामदार प्राथमिक शाळा , तपोवन रोड येथे शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे परिवाराच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करताना उपस्थित मान्यवर व विद्यार्थीवृंद.

# पैठणमध्ये विद्यार्थी–तरुणांचा सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ मोर्चा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** लडाखमधील पर्यावरण संरक्षण, स्थानिकांच्या हक्कांचे रक्षण आणि संविधानिक मागण्यांसाठी आवाज उठविणारे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ पैठण शहरात विद्यार्थी आणि तरुणांच्या वतीने मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चात मोठ्या संख्येने विद्यार्थी, युवक व नागरिक सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान सहभागी आंदोलनकर्त्यांनी हातात फलक घेऊन घोषणाबाजी करत सोनम वांगचुक यांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविला. तसेच केंद्र शासनाने लडाखमधील




जनतेच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

मोर्चा शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आला. आंदोलन शांततेत व शिस्तबद्ध वातावरणात पार पडले. यावेळी उपस्थितांनी पर्यावरण संवर्धन, लोकशाही मूल्यांचे संरक्षण आणि नागरिकांच्या हक्कांसाठी एकजूट आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

### शब्दकोडे क्रमांक : १०

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ■ | ५ | ६ | | ■ | ८ | | ९ |
| ■ | १० | | | | ■ | ११ | | १२ | | ■ | |
| १३ | | ■ | | ■ | १४ | ■ | १५ | | ■ | १६ | |
| १७ | | १८ | ■ | १९ | | २० | | ■ | २१ | | ■ |
| | ■ | २२ | २३ | | ■ | | ■ | २४ | | | |
| ■ | २५ | | | ■ | २६ | | २७ | | ■ | | ■ |
| २८ | | ■ | २९ | ३० | | ■ | | ■ | ३१ | ■ | ३२ |
| | ■ | ३३ | | | ■ | ३४ | ■ | ३५ | | | |
| ■ | ३६ | | ■ | ३७ | | | | ■ | | ■ | |
| ३८ | | ■ | ३९ | | ■ | | ■ | ४० | | ४१ | ■ |
| | ■ | ४२ | | ■ | ४२ | ■ | ४३ | | | | ४४ |
| ४५ | | | ■ | ४६ | | | ■ | | ■ | ४७ | |

**आडवे शब्द :** १. अचानक जुळून आलेला भेटीचा योग ५. उत्तर ८. लाट १०. वयोमानानुसार पाडलेला गट ११. सप्तसुरांची धून १३.'-- साया' एक जुना हिंदी सिनेमा १५. मनाचा ओढा १६. पवन १७. विमानाची धावपट्टी १९. कट २१. जम २२. काकडी २४. सांभाळ २५. सोने २६. उजळणी २८. नृत्य २९. माधव ३३. प्रियकर ३५. कयास ३६. उत्साह ३७. अशोक कुमार यांना हिंदी सिने जगत ओळखते ते टोपणनाव ३८. तुलना ३९. घबरट नसलेला ४२. बाण ४३.भारताची एक बहुचर्चित अंतराळ मोहीम ४५. धनुष्य ४६. युद्ध ४७. चांगला

**उभे शब्द :** २. गावठी ३.एक प्रसिद्ध रॅप स्टार **हनी सिंग ४. आकाश ६. वावर ७. तेजी ८. अंधार ९. केसांत माळायची एक पुष्पमाला १२. पंजाबी बोलीत-चूक १३. मेरठ-उलट लिहा १४.विचार १६. वर्तन १८. पगार १९. निवाळा २०. पालनपोषण करणारे २१. बारा वर्षांचा काळ २३. सिंह २४. प्रजा २५. एक पारदर्शक वस्तू २६.बनाव २७. रक्त २८. स्त्री ३०. गर्द ३१. वाद्य वाजवणारा ३२. माहेर-विरुद्ध ३३. वसा- उलट लिहा ३४.सागर ३६. शिष्य ३८. एका सरळ रेषेत नसलेला ३९. मनास दिलेला आधार ४०. विकसित ४१. प्रयत्न ४२. दोन आणि एक मिळून तयार होणारी संख्या ४२. सोबत ४४.आदराने वाकलेला

### शब्दकोडे क्रमांक : ९ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | वा | ह | न | ■ | हा | व | रा | ■ | चिं | त | न |
| रा | ■ | नी | ■ | जा | त | ■ | य | ल | गा | र | ■ |
| म | घा | ■ | रा | वा | ■ | दा | ता | ■ | री | ■ | दा |
| ■ | या | रा | ■ | ई | मा | न | ■ | चा | ■ | था | ट |
| ब | ळ | क | ट | ■ | घ | ■ | ना | य | गा | रा | ■ |
| दा | ■ | ट | ■ | वा | ■ | थे | ट | ■ | ठ | ■ | ते |
| म | नी | ■ | वा | च | न | ■ | क | ट | ■ | खा | रा |
| ■ | ट | क | म | क | ■ | क | ■ | प | री | ट | ■ |
| ता | ■ | रा | न | ■ | प | लं | ग | ■ | ळ | ■ | चि |
| श | र | म | ■ | स | ■ | क | ■ | मा | ■ | ना | व |
| ■ | सा | त | वा | ह | न | ■ | चा | ल | क | ■ | ट |
| चा | ळ | ■ | ळा | ■ | भ | र | ■ | क | द | र | ■ |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### उच्च न्यायालयाच्या आदेशाचा मान राखत आयएमएचा बंद मागे



अहिल्यानगर- डोंबिवली महापालिका रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांना झालेल्या मारहाणीच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशनसह विविध वैद्यकीय संघटनांनी सोमवार (दि. २०) जुलै रोजी पुकारलेला कामबंद आंदोलनाचा निर्णय मागे घेतला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा आदर करत हा निर्णय घेण्यात आल्याचे अहिल्यानगर आयएमएचे अध्यक्ष डॉ. धनंजय कुलकर्णी व सचिव डॉ. अमित करडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले. मुंबई उच्च न्यायालयाने दि. १८ जुलै रोजी या प्रकरणाची स्वतः हून दखल घेतली. तसेच सुटीच्या दिवशी विशेष सुनावणी घेत डोंबिवली महापालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयातील कर्तव्यावर असलेल्या डॉक्टर व कर्मचाऱ्यांना मारहाण तसेच शिवीगाळ केल्याच्या आरोपींचा जामीन स्थगित करण्याचे आदेश दिले. संबंधित आरोपींना दि. १९ जुलै रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत आत्मसमर्पण करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले. या पार्श्वभूमीवर न्यायालयाने सर्व संघटनांना दि. २० जुलै रोजीचे कामबंद आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले होते. न्यायालयाच्या या आवाहनाचा मान राखत आयएमए व इतर वैद्यकीय संघटनांनी आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. रुग्णांच्या हिताला बाधा येऊ नये, या भावनेतून हा निर्णय घेण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्र आरोग्य सेवा संरक्षण कायद्यात आवश्यक बदल करून तो अधिक प्रभावी व अजामीनपात्र करण्याची मागणी यापुढेही कायम राहणार असल्याचे आयएमएने स्पष्ट केले आहे. तसेच इतर प्रलंबित मागण्यांसाठी शासनाकडे पुन्हा ठामपणे पाठपुरावा करण्यात येईल. मागण्या मान्य न झाल्यास दि. १ ऑगस्टपासून देशव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

### रिपब्लिकन सेनेच्या कर्जत तालुकाध्यक्षपदी कोंडलकर यांची नियुक्ती



अहिल्यानगर - रिपब्लिकन सेनेच्या कर्जत तालुकाध्यक्षपदी सुरेश लक्ष्मण कोंडलकर यांची नियुक्ती करण्यात आली. रिपब्लिकन सेनेचे संस्थापक अध्यक्ष सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या आदेशानुसार सामाजिक कार्यातील योगदान, संघटन कौशल्य आणि पक्षनिष्ठेची दखल घेत ही नियुक्ती करण्यात आली. रिपब्लिकन सेनेचे अहिल्यानगर दक्षिण विभागाचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे यांच्या हस्ते सुरेश कोंडलकर यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी बोलताना सुनील शिंदे म्हणाले, रिपब्लिकन सेना ही सामाजिक न्याय आणि संविधानाच्या विचारांवर चालणारी चळवळ आहे. पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी गावागावात सक्षम नेतृत्व निर्माण करणे ही काळाची गरज असून, नव्या पदाधिकाऱ्यांनी जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून पक्ष अधिक बळकट करण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करावे असे आवाहन त्यांनी केले.या प्रसंगी रिपब्लिकन सेनेचे ज्येष्ठ नेते दिलीप साळवे, प्रकाश साळवे, प्रा. गौतम वाघमारे, नगर तालुका अध्यक्ष कृष्णा गाडे, लक्ष्मण साखरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ऊसतोडणी मजुरांच्या गुलामी व शोषणाविरोधात २४ जुलैला आंदोलन

अहिल्यानगर- ऊसतोडणी मजुरांवरील आर्थिक, शारीरिक, मानसिक आणि सामाजिक शोषणाविरोधात संघटित जनलढा उभारण्याचा निर्धार पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने करण्यात आला आहे. या प्रश्नांकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवार, २४ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'ऊसतोडणी मजूर गुलामी व शोषणविरोधी आंदोलन' करण्यात येणार असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी आणि अशोक सब्बन यांनी दिली. ऊसतोडणी मजूर हे बहुतांश गरीब, अशिक्षित, स्थलांतरित आणि असंघटित कुटुंबांतील असतात. मुकादम, ऊसतोडणी व वाहतूक कंत्राटदार आणि काही साखर कारखान्यांच्या व्यवस्थेमुळे अनेक मजूर कर्ज, आगाऊ रक्कम आणि एकतर्फी करारांच्या जाळ्यात अडकतात. ऊसतोडणीचा हंगाम सुरू झाल्यानंतर त्यांच्याकडून अत्यंत कष्टाचे काम करून घेतले जाते. मात्र योग्य मजुरी, सुरक्षित निवास, आरोग्यसेवा, अपघात विमा, महिलांची सुरक्षितता, मुलांचे शिक्षण आणि कायदेशीर संरक्षण यांकडे गंभीर दुर्लक्ष केले जाते.

# स्नेहबंधतर्फे गरजू बालकांना शर्टचे वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या संकल्पनेतून सावेडी येथील झोपडपट्टी परिसरातील गरीब व गरजू मुलांसाठी शर्टचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत वंचित घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

या प्रसंगी इंजिनियर अभिजीत ढाकणे, मिलिंद कानडे, आयुष लालबोन्द्रे, स्वयंम बास्कर व प्रथमेश राठोड उपस्थित होते. यावेळी मुलांना शर्टचे वितरण करण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, ''समाजातील प्रत्येक मुलाला सन्मानाने जगण्याचा आणि शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. गरजू मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविणे, त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करणे आणि समाजाने अशा मुलांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे ही काळाची गरज आहे. सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून प्रत्येकाने आपल्या परीने अशा उपक्रमांमध्ये सहभाग घेतला, तर समाज अधिक संवेदनशील आणि सक्षम बनेल.''

या उपक्रमामुळे मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, उपस्थितांनी स्नेहबंध फौंडेशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

# अहिल्यानगर सहोदय स्कूल कॉम्प्लेक्सची जिल्हास्तरीय कार्यशाळा उत्साहात

## शिक्षकांना 'कॉम्प्युटेशनल थिंकिंग' व 'कौशल्य विकासा'चे प्रभावी प्रशिक्षण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहमदनगर सहोदय स्कूल कॉम्प्लेक्स (एएसएससी) यांच्या वतीने सदस्य सीबीएसई शाळांतील शिक्षक व मुख्याध्यापकांसाठी 'कॉम्प्युटेशनल थिंकिंग' आणि 'कौशल्य विकास' या विषयांवरील जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. जिल्ह्यातील १९ सीबीएसई शाळांमधील ६५ हून अधिक शिक्षक आणि १२ मुख्याध्यापकांनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

शिक्षकांना कॉम्प्युटेशनल थिंकिंग आणि कौशल्य विकास या संकल्पना विद्यमान अभ्यासक्रमात प्रभावीपणे समाविष्ट करून अध्यापन अधिक परिणामकारक, अनुभवाधारित आणि क्षमता-केंद्रित कसे करता येईल, याविषयी कार्यशाळेत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये समस्या सोडविण्याची क्षमता, चिकित्सक विचार, सर्जनशीलता आणि जीवनोपयोगी कौशल्ये विकसित करण्यासाठी आवश्यक असलेल्या अध्यापन पद्धती, उपक्रम आणि कृतीशील तंत्रांची माहिती यावेळी देण्यात आली.

लॉजिकिड्स आणि लेंड अ हँड इंडिया या संस्थांतील तज्ज्ञ संसाधन व्यक्तींनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले. त्यांनी अभ्यासक्रमाच्या चौकटीचे सविस्तर स्पष्टीकरण देत प्रत्यक्ष वर्गात सहज राबविता येतील अशा नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, कृतीआधारित उपक्रम, प्रभावी उदाहरणे आणि अंमलबजावणीची विविध मॉडेल्स सादर केली.

प्रारंभी अहमदनगर सहोदय स्कूल कॉम्प्लेक्सच्या अध्यक्षा दीपिका नगरवाला यांनी सांगितले की, कोणत्याही शैक्षणिक बदलाचे खरे शिल्पकार शिक्षकच असतात. नवीन अभ्यासक्रम हा अतिरिक्त भार न समजता, तो विद्यमान अभ्यासक्रमात प्रभावीपणे समाविष्ट केल्यास अध्यापन अधिक अर्थपूर्ण आणि विद्यार्थीकेंद्रित होऊ शकते.

ही कार्यशाळा अहमदनगर सहोदय स्कूल कॉम्प्लेक्सच्या सचिव नम्रता ओहरी यांच्या यजमानपदाखाली डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन्स इंग्लिश मीडियम स्कूल येथे पार पडली. कार्यक्रमाच्या समारोपावेळी कोषाध्यक्षा नूतन मिश्रा यांनी लॉजिकिड्स आणि लेंड अ हँड इंडिया यांच्या संसाधन व्यक्तींचा सत्कार करून त्यांच्या योगदानाबद्दल आभार व्यक्त केले.

या उपक्रमाचे सीबीएसई जिल्हा समन्वयक जयश्री मेहेत्रे, सीबीएसई जिल्हा प्रशिक्षण समन्वयक अशोक सचदेव यांनी विशेष कौतुक केले. शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अशा क्षमता-वृद्धी कार्यक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

# वारीच्या भक्तिमय वातावरणात नेत्रदान- अवयवदानाचा जागर; वारकऱ्यांमार्फत समाजाला दिला जीवनदानाचा संदेश

## फिनिक्स सोशल फाऊंडेशन व जिल्हा रुग्णालयाचा अनोखा उपक्रम; दिंडीतून अवयवदान जनजागृती



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी वारीत भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माला समाजप्रबोधनाची जोड देत शहरात अवयवदान चळवळीबद्दल जागृती करण्यात आली. नेत्रदान व अवयवदानासाठी सातत्याने जनजागृती करणाऱ्या फिनिक्स सोशल फाऊंडेशन आणि अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयाच्या अवयवदान समुपदेशन विभागाच्या संयुक्त विद्यमाने शहरातून मार्गक्रमण करणाऱ्या वारकऱ्यांच्या दिंडीत नेत्रदान व अवयवदानाबाबत जनजागृती करण्यात आली. या उपक्रमाला वारकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अवयवदानाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला.

शहरातील प्रमुख मार्गांवरून जाणाऱ्या दिंडीत सहभागी झालेल्या वारकऱ्यांच्या हातात नेत्रदान व अवयवदानाचे महत्त्व सांगणारे जनजागृतीपर फलक व बॅनर देण्यात आले होते. ''अवयवदान हेच श्रेष्ठ दान'', ''नेत्रदानाने अंधांच्या जीवनात प्रकाश फुलवा'', ''मरणोत्तर अवयवदानातून अनेकांना नवे जीवन मिळू शकते'' अशा संदेशांद्वारे नागरिकांना अवयवदानासाठी प्रेरित करण्यात आले.

दिंडी मार्गावरील नागरिकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत अवयवदानाविषयी माहिती जाणून घेतली. अनेकांनी अवयवदानाबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. धार्मिक आणि सामाजिक संदेशाची सांगड घालत राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे समाजात अवयवदानाविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली.

या जनजागृती मोहिमेत फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे तसेच अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयाचे अवयवदान समुपदेशक सतीश आहिरे यांनी वारकऱ्यांसोबत सहभाग नोंदवत नागरिकांना अवयवदानाचे महत्त्व समजावून सांगितले.

फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे म्हणाले, अवयवदान आणि नेत्रदान ही मानवतेची सर्वोच्च सेवा आहे. एका व्यक्तीच्या मरणोत्तर अवयवदानामुळे अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळू शकते, तर नेत्रदानामुळे अंध व्यक्तींच्या आयुष्यात प्रकाश निर्माण होतो. धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांमधून जनजागृती केल्यास हा संदेश मोठ्या प्रमाणावर समाजापर्यंत पोहोचतो. प्रत्येक नागरिकाने अवयवदानाचा संकल्प करून आपल्या कुटुंबीयांनाही त्याबाबत माहिती देण्याचे त्यांनी आवाहन केले.

जिल्हा रुग्णालयाचे समुपदेशक सतीश आहिरे म्हणाले की, अवयवदानाबाबत समाजात अजूनही अनेक गैरसमज आहेत. योग्य माहिती आणि जनजागृतीद्वारे हे गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. अवयवदानामुळे अनेक गंभीर रुग्णांना जीवनदान मिळू शकते. प्रत्येकाने अवयवदानाबाबत सकारात्मक विचार करून शासनाच्या अधिकृत प्रक्रियेनुसार नोंदणी करावी. अशा जनजागृती मोहिमा समाजात मोठा सकारात्मक बदल घडवून आणता येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

# रंगोत्सव २०२६ अंतर्गत राज्यस्तरीय खुली सोलो स्वगत स्पर्धा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** हौशी प्रायोगिक कलावंत संघ, अहिल्यानगर शाखेच्या वतीने रंगोत्सव २०२६ अंतर्गत राज्यस्तरीय खुली सोलो स्वगत स्पर्धा रविवार, दि. २६ जुलै २०२६ रोजी आयएमएससीडीआर ऑडिटोरियम, पहिला मजला, नगर कॉलेजसमोर, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली आहे.

राज्यभरातील हौशी कलाकार, रंगकर्मी आणि नाट्यप्रेमींना आपल्या अभिनय कौशल्याचे सादरीकरण करण्यासाठी ही स्पर्धा एक प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे. स्पर्धेची प्रवेश फी १०० रुपये असून, विजेत्यांना आकर्षक रोख पारितोषिके, सन्मानचिन्हे आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत.

कार्यक्रमास हौशी प्रायोगिक कलावंत संघाच्या मध्यवर्ती शाखेचे प्रमुख कार्यवाह अजय धवणे (चंद्रपूर), सुरेश गांगुर्डे (मुंबई) आणि सिने नाट्य अभिनेते मोहिनीराज गटणे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेतील प्रथम क्रमांकास ३,००० रुपये, द्वितीय क्रमांकास २,००० रुपये, तृतीय क्रमांकास १,००० रुपये, तसेच दोन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी ५०० रुपये अशी रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक केक फाउंडेशन यांच्या सौजन्याने, द्वितीय पारितोषिक स्व. रंगकर्मी श्रीराम कुलकर्णी स्मरणार्थ, तर तृतीय पारितोषिक स्व. रंगकर्मी अनिलकुमार खेडेकर स्मरणार्थ प्रदान करण्यात येणार आहे.

या स्पर्धेस श्रेणिक शिंगवी, केक फाउंडेशन, नटेश्वर कला क्रीडा मंडळ, राहुरी, साईरथ टूर्स अँड ट्रॅव्हल्स तसेच वेव्हलनेस एंटरप्रायझेस यांचे प्रायोजकत्व लाभले आहे. स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कलाकारांनी अधिक माहितीसाठी नानाभाऊ मोरे (मो. ९६०४९०१७९५) किंवा मोनेश ढाळे (मो. ९९७०३५५१३४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन हौशी प्रायोगिक कलावंत संघ, अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष संजय लोळगे यांनी केले आहे.

# जन्मदिवसा निमित्त काटेवाडीत शालेय साहीत्य वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**खरवंडी कासार –** पाथर्डी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी येथे अनावश्यक खर्चाला फाटा देत जन्म दिवसा निमित्त ईयत्ता १ली ते ४थी विद्यार्थांना शालेय साहीत्य वाटप करण्यात आले सविस्तर वृत्त असे की मुंबई येथे पोलीस म्हणून कार्यरत असणारे बाळासाहेब ढाकणे यांचा मुलगा अतिक्ष वय वर्ष १ पहीला वाढदिवस शालेय विद्यार्थां समवेत सह कुटुंब साजरा करण्यात आला उपस्थित ग्रामस्थां हस्ते शालेय साहित्य खाऊ वाटप करण्यात आले यावेळी जिल्हा परिषद प्रा. शाळा आदर्श मुख्याध्यापक भिमराव पाखरे यानी मुंबई पोलिस बाळासाहेब ढाकणे यांचा सन्मान केला तर उपस्थित मान्यवरांचे आभार शिक्षक खेडकर यांनी मानले यावेळी पांडुरंग ढाकणे प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचारी विनोद घुले रामकिसन ढाकणे आदी काटेवाडी ग्रामस्थ उपस्थित होते.

# अखिल भारतीय क्लासिक आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा बक्षीस वितरण

## अवघ्या ११ वर्षीय बारामतीचा शौर्य भोंडवेचा तिसऱ्या नरेंद्र फिरोदिया चषकावर झंझावाती विजय तर उपविजेता पुण्याचा गिरीश सरवनकर



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तिसऱ्या नरेंद्र फिरोदिया चषक अखिल भारतीय क्लासिक आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे उत्साहात पार पडला. तीन दिवस रंगलेल्या या स्पर्धेत देशभरातील बुद्धिबळपटूंनी आपल्या बुद्धिमत्तेचा कस लावत उत्कंठावर्धक सामने खेळले. हे सामने पाहण्यासाठी नगरकरांनी गर्दी केली होती.

देशाचे भावी ग्रँडमास्टर पाहण्याची संधी मिळाली.

अंदाजे आठ राज्ये, १७ जिल्ह्या मधून आलेल्या खेळाडू पालक व कोचेस ने अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या आयोजना वर व भोजन व्यवस्थेवर समाधान व्यक्त केले.स्पर्धेत पुण्याच्या अवघ्या ११ वर्षीय शौर्य भोंडवे याने दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले, तर गिरीश सरवनकर यांनी उपविजेतेपद मिळविले. लहान वयात मिळविलेल्या या यशामुळे शौर्यचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

प्रास्ताविकात संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी संघटनेच्या कार्याचा आढावा घेत बुद्धिबळाचा प्रसार आणि खेळाडूंना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या संधींची माहिती दिली.

यावेळी अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करताना सांगितले की, विजय आणि पराभव हा खेळाचा अविभाज्य भाग आहे. पराभवाने खचून न जाता त्यातून शिकून अधिक मेहनत घ्यावी. सातत्य, संयम आणि सराव यांच्या जोरावर प्रत्येक खेळाडू मोठे यश मिळवू शकतो. आजचे पराभव उद्याच्या विजयाची पायाभरणी असतात. सर्व विजेत्यांचे अभिनंदन तसेच सहभागी प्रत्येक स्पर्धकाचेही कौतुक केले.

यानंतर मान्यवरांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना चषक, रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, सचिव यशवंत बापट, सुबोध ठोंबरे, पारुनाथ ढोकळे, शाम कांबळे, अनुराधा बापट, प्रकाश गुजराथी, रोहिणी आडकर, शुभदा ठोंबरे, संजय खडके, स्वप्निल भगूरकर, नवनीत कोठारी, अतुल कोठारी, कौस्तुभ ठोंबरे, विशाल गुजराथी, दत्ता घाडगे, पंच प्रवीण ठाकरे, पवन राठी, दीपक चव्हाण, डी. बी. चौरे, शार्दुल तापसे, देवेंद्र ढोकळे, शिरीष इंदलकर, प्रशांत धंगेकर, गायत्री कुलकर्णी यांच्यासह खेळाडू, पालक व बुद्धिबळप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संघटनेचे खजिनदार सुबोध ठोंबरे यांनी केले.

## जाहीर नोटीस

**अहमदनगर येथील मे. उपविभागीय अधिकारी, नगर भाग अहमदनगर यांचे कोर्टात**

आरटीएस अपील नं. १८/२०२६

रेस्पॉडंट नं. ३, सहादू नाना बेरड (मयत वारस) ३ ब सुनिता लक्ष्मण वाळके, रा. जगतगुरू सोसायटी, अनु. क्र. ८८/१/७, प्लॉट नं. १२, लोहगाव पुणे, ३ क. कमल सहादू बेरड, रा. शहापूर, पो. निंबोडी, ता. जि. अहिल्यानगर यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येथे की, मौजे शहापूर, ता. अहिल्यानगर येथील गट नं. ६० चे संदर्भात मंडळाधिकारी चिचोंडी पाटील, ता. अहिल्यानगर यांनी तक्रार केस नं. २३/२०२५ मध्ये फेरफार क्र. १९४४ बाबत दि. १२/११/२०२५ रोजी पारीत केलेले आदेशावर नाराज होऊन अपेलंट यांनी सदरचे अपील दाखल केलेले आहे.

प्रस्तुत अपीलाचे सुनावणीकामी तुमचे पत्त्यावर वारंवार नोटीस पाठवूनही देखील बजावणी होत नसलेने तुमचे विरूध्द मे. कोर्टाने जाहीर नोटीसीचा आदेश केलेला आहे.

प्रस्तुत अपीलाचे सुनावणीकामी दिनांक २७/०७/२०२६ रोजी सकाळी ११ : ०० वा. 'उपविभागीय अधिकारी, नगर भाग अहमदनगर' यांचे दालनात नेमण्यात आली आहे.

सबब तुम्ही किंवा तुमच्या कायदेशीर प्रतिनिधींनी तुमचा कोणताही पुरावा असल्यास त्यासह सदरहू तारेखस ठिकाणी व वेळी माझेसमोर उपस्थित रहावे. वर निर्दीष्ठ केलेल्या वेळी व ठिकाणी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या किंवा कायदेशीर प्रतिनिधींच्या अनुपस्थितीत अर्जाची एकतर्फा सुनावणी होऊन योग्य तो निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

सदरील जाहीर नोटीस माझे सही व शिक्क्यानिशी आज दि. ०७/०७ /२०२५ रोजी दिली असे.

उपविभागी अधिकारी<br>नगर भाग अहमदनगर<br>आरटीएस अपी नं. १८/२०२६

(शिक्का)


सही/<br>(सुधीर पाटील)<br>उपविभागीय अधिकारी,<br>अहिल्यानगर भाग अहिल्यानगर

# माजी प्राचार्या हेमलता गीते यांच्या 'मानवसूक्त' काव्यसंग्रहाला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले काव्य पुरस्कार जाहीर

**स्त्रीशक्ती, मातृत्व आणि जीवनमूल्यांचा वेध घेणाऱ्या 'मानवसूक्त'ला मानाचा सन्मान | जगतगुरु संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय सातवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात पुरस्काराने होणार गौरव**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**






**अहिल्यानगर–** मातृत्व, स्त्रीशक्ती, मानवी संवेदना आणि जीवनमूल्यांचा प्रभावी शब्दाविष्कार करणाऱ्या ज्येष्ठ कवयित्री तथा माजी प्राचार्या हेमलता प्रदीप गीते यांच्या 'मानवसूक्त' या काव्यसंग्रहाला स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने दिला जाणारा 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले काव्य पुरस्कार' जाहीर झाला आहे. साहित्य क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

हा पुरस्कार २५ जुलै रोजी निमगाव वाघा (ता. नगर) येथे आयोजित 'जगतगुरु संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय सातवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन' सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. आषाढी एकादशी आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने या साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष तथा साहित्य संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली.

हेमलता गीते या मराठी साहित्यविश्वातील संवेदनशील आणि अभ्यासू कवयित्री म्हणून ओळखल्या जातात. त्यांच्या 'मातृवृक्ष' या पहिल्या कवितासंग्रहाचे प्रकाशन अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांच्या हस्ते झाले होते. या काव्यसंग्रहाला राज्यस्तरीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

नुकताच प्रकाशित झालेला त्यांचा 'मानवसूक्त' हा दुसरा काव्यसंग्रह साहित्यप्रेमींकडून विशेष दाद मिळवत आहे. या संग्रहात शंभर निवडक कवितांचा समावेश असून, प्रत्येक कवितेत जीवनातील विविध अनुभव, नाती, भावभावना, संघर्ष, संवेदना आणि मूल्यांचा प्रभावी आविष्कार करण्यात आला आहे. मानवी आयुष्याच्या अनेक छटा या कवितांमधून प्रत्ययास येतात. जीवनातील सुख–दुःख, आशा–निराशा, नातेसंबंध, सामाजिक वास्तव आणि सकारात्मक विचार यांचे अत्यंत प्रभावी चित्रण या काव्यसंग्रहात आढळते.

विशेष म्हणजे, आजच्या स्पर्धात्मक आणि तणावग्रस्त जीवनात अपयशामुळे अनेक तरुण नैराश्याकडे व आत्महत्येसारख्या टोकाच्या निर्णयांकडे वळताना दिसतात. अशा युवकांना आत्मविश्वास, जिद्द आणि सकारात्मक जीवनदृष्टी देणाऱ्या प्रेरणादायी कविता 'मानवसूक्त'मध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

# विद्यार्थ्यांनी आई–वडील व गुरुजन यांचा नेहमीच आदर बाळगावा – छायाताई फिरोदिया

**स्टुडन्ट टॅलेंट सर्च परीक्षेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मोठा उत्साहाने साजरा**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** स्टुडन्ट टॅलेंट सर्च ही स्पर्धा परीक्षा हिंदसेवा मंडळाचे वतीने उत्कृष्ट पद्धतीने घेण्यात येत आहे.या स्पर्धा परीक्षेसाठी मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे व त्यांचे सहकारी शिक्षक परिश्रम घेत आहेत.स्वामी विवेकानंद इंग्लंडला गेले असता त्यांनी अतिशय सुंदर भाषण केले.त्यावेळी अनेक लोक त्यांना भेटले. गर्दीतून वाट काढत एक महिला पुढे आली व म्हणाली मला तुम्ही ज्या शाळेत शिकले त्या शाळेत माझ्या मुलाला टाकायचे आहे.त्यावेळी स्वामी विवेकानंद म्हणाले, माझी शाळा,माझी आई आहे.ती आता हयात नाही.असे सांगितले.

स्पर्धा परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामागे त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक व प्रोत्साहन देणारे पालक यांचे मोठे योगदान आहे. विद्यार्थ्यांना आदर्श नागरिक बनविण्याचे काम ते करीत असतात. विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घ्यावे.त्यांच्यासाठी अनेक शिक्षणांची शिक्षणाची दालने उघडणार आहेत. त्यांनी आवडीचे दालन निवडून जीवनात यशस्वी व्हावे. विद्यार्थ्यांनी आई–वडील व गुरुजन यांचा नेहमीच आदर बाळगावा.असे प्रतिपादन अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे मुख्य कार्यवाहक छायाताई फिरोदिया यांनी केले आहे.

सावडे येथील माऊली सभागृहात हिंद सेवा मंडळ आयोजित कै.गोकुळशेठ गांधी यांचे स्मरणार्थ स्टुडंट टॅलेंट सर्च २०२६ या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहाने पार पडला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अ.ए.सो.च्या मुख्य कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया हे होते.तर प्रमुख उपस्थितीत हिंद सेवा मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा,बचपन स्कूलचे संचालिका श्रीमती पुष्पाताई गांधी,कार्यकारणी सदस्या प्रा.ज्योतीताई कुलकर्णी, विष्णूशेठ सारडा,स्पर्धा प्रमुख मधुसूदन सारडा,स्पर्धा संयोजक विठ्ठल उरमुडे आदी उपस्थित होते.

ब्रिजलाल सारडा म्हणाले,अहमदनगर एज्युकेशन सोसायटी व हिंद सेवा मंडळ या शतकोत्तर वाटचाल करणाऱ्या शिक्षण संस्था आहेत. फिरोदिया परिवाराचे शैक्षणिक व सार्वजनिक तसेच वेगवेगळ्या क्षेत्रात मोठे योगदान आहे.कै.गोकुळ गांधी यांच्या संकल्पनेतून स्टुडंट टॅलेंट सर्च परीक्षा सुरू करण्यात आली आहे. ज्ञानासारखे पवित्र असे काहीच नाही.डिजिटल व ग्लोबलायझेशनच्या युगात विद्यार्थ्यांनी मागे पडू नये यासाठी स्टुडंट टॅलेंट सर्च ही स्पर्धा परीक्षा घेण्यात येत आहे.विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम वेगवेगळ्या शिक्षण संस्था करीत आहेत.भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे, ''कर्मण्येवा धिकारस्ते मा फलेषु कदाचन''याप्रमाणे विद्यार्थ्यांनी फळाची अपेक्षा न करता कार्य करावे यश निश्चित मिळेल.

मधुसूदन सारडा प्रास्ताविकात म्हणाले, विद्यार्थ्यांनो तुमच्या यशामागे मेहनत जिद्द व सातत्य पूर्ण अभ्यास आहे. पण याच बरोबर शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे प्रोत्साहन हे देखील आहे त्यामुळे हा सन्मान विद्यार्थ्यांबरोबरच पालक व शिक्षकांचा देखील आहे. ज्यांना या स्पर्धेत बक्षिसे मिळालेले आहेत त्यांचे मनः पूर्वक अभिनंदन तसेच ज्यांना बक्षीस मिळाली नाहीत त्यांनी निराश होऊ नये.विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास आणि मेहनतीच्या बळावर सातत्यपूर्ण अभ्यास करून पुढील वर्षी या व्यासपीठावर यावे. विद्यार्थ्यांना यशाबरोबरच चांगले संस्कार,शिस्त,वेळेचे महत्व,देशप्रेम,समाजाप्रती असलेली जबाबदारी तितकीच महत्त्वाची आहे.शिक्षणाचा खरा उद्देश चांगला माणूस घडविणे हा आहे.

विठ्ठल उरमुडे म्हणाले,गेल्या वीस वर्षापासून स्टुडंट टॅलेंट सर्च परीक्षा घेण्यात येत आहेत.या स्पर्धेला जिल्ह्यातून मोठा प्रतिसाद मिळत आहे.पूर्वी अशोकभाऊ मेरिट फाउंडेशनच्या वतीने घेण्यात येणारी परीक्षा एक आदर्श परीक्षा होती.ज्यावेळेस एखादी संस्था परीक्षा घेते त्यावेळेस विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्तेत वाढ व्हावी.प्रत्येकाला संधी मिळावी हाच एक उद्देश समोर असतो.

सूत्रसंचालन सौ.मनिषा साळी व अमोल शिंदे यांनी केले.

# अहिल्यानगर मान्सून हेल्थ वॉच: स्टार हेल्थकडून ताप, डेंग्यू आणि मलेरियाच्या धोक्याचा इशारा

**डॉक्टरांचा सल्ला आणि होम हेल्थकेअरच्या उपलब्धतेत वाढ**

विमाधारक होम हेल्थकेअर आणि नियोजित रुग्णालयात दाखल होण्याच्या मदतीसाठी टॉक टू स्टारला ७२०० २२२ ३३३ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तर बिगर–विमाधारक स्टार हेल्थ कस्टमर ॲपच्या माध्यमातून मोफत २४/७ व्हर्च्युअल ओपीडी सेवेचा लाभ घेऊ शकतात

अहिल्यानगरसाठी महत्त्वाचे मुद्दे

महाराष्ट्रात आर्थिक वर्ष २०२५–२६ मध्ये ताप आणि संसर्गजन्य आजारांसाठी स्टार हेल्थच्या होम हेल्थकेअरचा वापर करणाऱ्यांच्या संख्येत पाच पटीने वाढ झाली आहे.ग्राहक वैद्यकीय सल्ल्यासाठी पहिली पायरी म्हणून ऑनलाईन डॉक्टरांच्या सल्ल्याला मोठ्या प्रमाणावर पसंती देत असल्याने व्हर्च्युअल ओपीडीचा वापर वेगाने वाढत आहे.विमाधारक टॉक टू स्टारला ७२०० २२२ ३३३ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात; होम हेल्थकेअरसाठी १ दाबा आणि नियोजित रुग्णालयात दाखल होण्याच्या मदतीसाठी २ दाबा.

बिगर–विमाधारक स्टार हेल्थ कस्टमर ॲपच्या माध्यमातून मोफत २४/७ व्हर्च्युअल ओपीडी सेवेचा लाभ घेऊ शकतात.

अहिल्यानगर, २० जुलै, २०२६: अहिल्यानगरमध्ये पावसाळा सुरू झाला असून या काळात डेंग्यू, मलेरिया, ताप आणि इतर संसर्गजन्य आजार सामान्यतः वाढतात. याच पार्श्वभूमीवर स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (: ; : ५४३४१२) या भारतातील आघाडीच्या स्वतंत्र आरोग्य विमा कंपनीने राज्यभरात आपली पावसाळी आरोग्य सेवा मोहीम अधिक तीव्र केली आहे. स्टार हेल्थच्या आर्थिक वर्ष २०२५–२६ च्या महाराष्ट्रातील आकडेवारीनुसार, ताप आणि संसर्गजन्य आजारांसाठी होम हेल्थकेअर सेवेचा वापर करणाऱ्यांच्या संख्येत पाच पटीने वाढ झाली आहे. या वाढीसोबत, कंपनीने देशभरात नुकत्याच सुरू केलेल्या व्हर्च्युअल ओपीडी सेवेलाही अभूतपूर्व मागणी मिळाली आहे, ग्राहक वैद्यकीय सल्ल्यासाठी पहिली पायरी म्हणून या सेवेला मोठ्या प्रमाणावर पसंती देत आहेत.

या मोहिमेचा मुख्य उद्देश विमाधारकांना टॉक टू स्टार आणि होम हेल्थकेअर मदतीशी जोडून आजाराच्या सुरुवातीच्या टप्प्यात मदत मिळवून देणे हा आहे. त्याच वेळी सर्वसामान्य जनतेला स्टार हेल्थ कस्टमर ॲपच्या माध्यमातून मोफत २४/७ व्हर्च्युअल ओपीडी सेवेचा लाभ घेता येणार आहे. विमाधारकांसाठी टॉक टू स्टारचा ७२०० २२२ ३३३ हा मार्गदर्शक संपर्क क्रमांक असेल, जिथे होम हेल्थकेअर सेवेसाठी १ दाबा आणि नियोजित रुग्णालयात दाखल होण्याच्या मदतीसाठी २ दाबा.

या उपक्रमाबाबत मत व्यक्त करत स्टार हेल्थ इन्शुरन्सचे बिझनेस हेड श्री. विजय अरोरा म्हणाले:

''पावसाळ्यात ताप, डेंग्यू, मलेरिया आणि संसर्गजन्य आजार वाढणे स्वाभाविक असते, पण अनेकदा कुटुंब लक्षणे गंभीर होईपर्यंत वाट पाहतात. या ऋतूत वैद्यकीय मदतीची पहिली पायरी सोपी करणे हाच आमचा प्रयत्न आहे. विमाधारक होम हेल्थकेअर किंवा नियोजित रुग्णालयात दाखल होण्याच्या मार्गदर्शनासाठी टॉक टू स्टारला ७२०० २२२ ३३३ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तर सर्वसामान्य जनता मोफत २४/७ व्हर्च्युअल ओपीडी सल्ला बुक करण्यासाठी स्टार हेल्थ ॲपचा वापर करू शकतात. या ऋतूत वेळेवर घेतलेला सल्ला खूप महत्त्वाचा ठरू शकतो.''

कमी खर्च आणि पावसाळ्यासाठी सज्ज केअर: होम हेल्थकेअरचे महत्त्व

२०२६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या नॅशनल स्टॅटिस्टिकल ऑफिसच्या कौटुंबिक आरोग्य खर्चावरील ८०व्या फेरीच्या सर्वेक्षणातील आकडेवारी आजारपण आणि रुग्णालयात दाखल होण्यामुळे कुटुंबांवर पडणारा आर्थिक भार अधोरेखित करते. महाराष्ट्रात खाजगी रुग्णालयात दाखल होण्याचा सरासरी खर्च ग्रामीण भागात ४४,५८० रुपये आणि शहरी भागात ६७,८३१ रुपये आहे, ज्यामध्ये रुग्णालयात दाखल होण्याच्या खर्चाचा जवळपास ९० टक्के हिस्सा व्यक्ती आणि कुटुंबांना स्वतःच्या खिशातून सोसावा लागतो.

स्टार हेल्थचा मान्सून सपोर्ट प्रोटोकॉल दोन स्पष्ट मार्ग तयार करून ही तफावत दूर करण्या–चे काम करतो आणि हे दोन मार्ग आहेत विमाधारकांसाठी टॉक टू स्टार आणि सर्वसामान्य जनतेसाठी स्टार हेल्थ कस्टमर ॲपद्वारे मोफत व्हर्च्युअल ओपीडी. एकत्रितपणे, या सेवा कुटुंबांना लक्षणे गंभीर होण्यापूर्वी किंवा रुग्णालयात जाण्याची वेळ येण्यापूर्वी वैद्यकीय सल्ला घेण्याचा सोपा व जलद मार्ग उपलब्ध करून देतात.

या उपक्रमांतर्गत पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर तीन अत्यंत महत्त्वाच्या आणि वेळेवर मिळणाऱ्या सेवा एकत्र आणल्या आहेत:

- विमाधारकांसाठी अमर्यादित टेलिकन्सल्टेशन्स (ऑनलाईन डॉक्टरांचा सल्ला): विमाधारक पॉलिसीच्या कालावधीत अमर्यादित वेळेस ऑनलाईन डॉक्टरांचा सल्ला घेऊ शकतात. यामुळे ताप किंवा संसर्गाचे पहिले लक्षण दिसताच वेळेवर वैद्यकीय सल्ला घेण्यास प्रोत्साहन मिळते.
- विमाधारकांसाठी टॉक टू स्टार: विमाधारक मार्गदर्शनासाठी आणि मदतीसाठी ७२०० २२२ ३३३ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात. होम हेल्थकेअरसाठी १ दाबा आणि नियोजित रुग्णालयात दाखल होण्याच्या मदतीसाठी २ दाबा. ही सेवा ग्राहकांना उपचारांचे पर्याय, कॅशलेस प्रक्रिया, नेटवर्कमधील रुग्णालयांचे पर्याय आणि कोणती कागदपत्रे तयार ठेवायची हे समजून घेण्यास मदत करते.
- कॅशलेस होम हेल्थकेअर: पात्र विमाधारकांसाठी, ज्यांच्या आजाराचे व्यवस्थापन वैद्यकीय देखरेखीखाली घरीच केले जाऊ शकते, स्टार हेल्थ डॉक्टरांनी लिहून दिलेल्या घरगुती उपचारांचा खर्च उचलते. यामध्ये रुग्णाच्या घरी पुरवली जाणारी व्यावसायिक नर्सिंग सेवा, नियमित रक्त चाचण्या आणि देखरेख, सलाईन आणि इंजेक्शन या सेवांचा समावेश असू शकतो.

सर्वसामान्य जनतेसाठी मोफत व्हर्च्युअल ओपीडी:

बिगर–विमाधारक आणि सर्वसामान्य नागरिक स्टार हेल्थ कस्टमर ॲपच्या माध्यमातून या सेवेचा लाभ घेऊ शकतात, जिथे वापरकर्ते पावसाळ्यातील सामान्य लक्षणांसाठी मोफत २४/७ व्हर्च्युअल ओपीडी सल्ला बुक करू शकतात.

या सेवेचा लाभ घेण्यासाठी वापरकर्ते खालील पायऱ्यांचे अनुसरण करू शकतात:

१.स्मार्टफोनवर स्टार हेल्थ कस्टमर ॲप डाऊनलोड करा.

२.उपलब्ध आरोग्य फायद्यांचा लाभ घेण्यासाठी नाव, ईमेल आयडी आणि जन्मतारीख यासारख्या मूलभूत माहितीसह साइन अप (नोंदणी) करा.

३.ॲपमधील मेनू उघडा आणि 'टेलीमेडिसिन पर्याय निवडा.

४.संबंधित क्षेत्रातील अनुभवी डॉक्टरांसोबत मोफत ऑनलाईन सल्लामसलत बुक करा.

या मोहिमेचा भाग म्हणून स्टार हेल्थ संपूर्ण राज्यातील कुटुंबांना, विशेषतः शाळकरी मुले आणि ज्येष्ठ नागरिक असलेल्या कुटुंबांना पावसाळ्यातील प्राधान्य आरोग्य नियमांचे पालन करण्याचे आवाहन करत आहे: सतत येणाऱ्या तापाकडे दुर्लक्ष करू नका, सुरुवातीच्या टप्प्यातच वैद्यकीय सल्ला घ्या आणि मदतीसाठी योग्य मार्ग निवडा. विमाधारक टॉक टू स्टारला ७२०० २२२ ३३३ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तर बिगर–विमाधारक स्टार हेल्थ कस्टमर ॲपच्या माध्यमातून मोफत २४/७ व्हर्च्युअल ओपीडी सल्ला बुक करू शकतात. या पावसाळ्यात राज्यातील कुटुंबांसाठी एक गोष्ट अगदी स्पष्ट आहे: सतत येणाऱ्या तापाकडे दुर्लक्ष करता कामा नये आणि डॉक्टरांशी लवकर संपर्क साधल्यास, म्हणजेच विमाधारकांसाठी फोनद्वारे किंवा सर्वसामान्य जनतेसाठी मोफत २४/७ व्हर्च्युअल ओपीडीद्वारे, लक्षणे गंभीर होण्यापूर्वी योग्य पावले उचलण्यास कुटुंबांना मदत होऊ शकते.

# नियमित वारी करणारा वारकरी – हभप बाबुराव लोहोकरे

**वारुळवाडीत गणेशवाडी दिंडीचे उत्साहात स्वागत**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** पंढरीचा विठोबा हा अवघ्या महाराष्ट्राचं प्राणप्रिय दैवत आहे आषाढी एकादशी म्हणजे एक अ अवर्णीय सोहळा असतो. हा सोहळा अनुभवण्यासाठी पंढरपूरला दिंडीमध्ये जाऊन पांडुरंगाचे दर्शन घेतल्याने वारी पूर्ण होते. जो नियमित वारी करतो तो वारकरी असे प्रतिपादन दिंडी चालक हभप बाबुराव महाराज लोहोकरे यांनी केले.

वारूळवाडी येथे श्रीक्षेत्र गणेशवाडी ते पंढरपूर या पायी दिंडीचे स्वागत जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेचे माजी अध्यक्ष सुभाष कराळे यांनी केले. यावेळी हभप बाबूराव महाराज यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी श्रीमती हारूबाई कराळे, बाबासाहेब कराळे, सुभाष कराळे,आनंद कराळे, संदीप कराळे, सौ.विद्या कराळे,वैष्णवी कराळे, योगिता कराळे, दीप्ती कराळे, मंदा कराळे, सुनीता कराळे, वृषाली कराळे, उषा कराळे,कांता सुंबे, शांता उरमुडे,तारा कर्डिले, मीरा साबळे, वैशाली साळुंके,बाबासाहेब लोहकरे, गणेश घुले, मच्छिंद्र पडवळे, गणेश मोटे, ज्ञानदेव दाणी, नवनाथ चव्हाण परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोहोकरे महाराजांनी सांगितले की वारीचे सामर्थ्य खूप मोठे आहे. या वारीचे स्वागत इतर धर्मातील लोक सुद्धा भक्ती भवानी करून वारी सहभागी होतात तेव्हा या वारीचे महत्त्व समजते. यावेळी दिंडीतील सर्व वारकऱ्यांना दुपारचे भोजन देण्यात आले.

# शिवसेनेचे ज्येष्ठ नेते जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले यांना मातृशोक

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले यांच्या मातोश्री राजलक्ष्मी कामळत यांचे वयाच्या ९१ व्या वर्षी आज पहाटे केरळ राज्यातील चलाकुडी येथे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने टायरवाले कुटुंबीयांवर शोककळा पसरली असून विविध सामाजिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण केली. आज सकाळी चलाकुडी (केरळ) येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुले, मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

स्वर्गीय राजलक्ष्मी कामळत यांना समाजकार्याची विशेष आवड होती. आपल्या गावामध्ये त्यांनी सामाजिक बांधिलकी जपत अनेक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला होता. साधेपणा, सेवाभाव आणि समाजाप्रती असलेली आत्मीयता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख होती.

त्यांनी जोपासलेले समाजसेवेचे संस्कार आणि सेवाभावाचा वारसा पुढे नेत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, धार्मिक आणि जनहिताच्या विविध उपक्रमांद्वारे स्वतःचा वेगळा ठसा उमटविला आहे. राजलक्ष्मी कामळत यांच्या निधनाने टायरवाले कुटुंबियांसह त्यांना जवळून ओळखणाऱ्या सर्व स्तरातील नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत असून त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

(पान १ वरून)

## गावठी कट्टे विक्रीसाठी आलेले दोन अट्टल गुन्हेगार जेरबंद

सापळा रचून कारमधील पिंटू उर्फ भाऊ आनंदा रसाळ आणि बंटी उर्फ स्वप्निल बिभीषण पाबळे यांना शिताफीने ताब्यात घेतले. आरोपींकडून २ लाख ५० हजार रुपये किमतीचे ५ गावठी कट्टे, ४० हजार रुपयांचे २ मोबाईल आणि ८ लाख रुपयांची स्कोडा कार जप्त करण्यात आली. चौकशीत ही शस्त्रे धाराशिव येथील फरार आरोपी भय्या उर्फ ऋषिकेश सुभाष भोसले याच्याकडून विक्रीसाठी आणल्याचे उघड झाले. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, उपनिरीक्षक अनंत सालगुडे, कृष्णकुमार सेदवड आणि एलसीबीच्या पथकाने केली.

## विद्यार्थी-युवकांच्या न्याय हक्कासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे निदर्शने

यावेळी जिल्हाध्यक्ष दादाभाऊ कळमकर, जिल्हा उपाध्यक्ष किसनराव लोटके, कार्याध्यक्ष नामदेवराव पवार, विधानसभा अध्यक्ष निलेश मालपाणी, युवक जिल्हाअध्यक्ष प्रकाश पोटे, फारुख रंगरेज, उद्धवराव दुसुंगे, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अथर खान, समीर पठाण, युवक अध्यक्ष रोहन शेलार, मतीन शेख, परवेज शेख, असीर शेख, ओंकार हलगे, सुशांत भापकर, अजहर शेख, आशिष सूर्यवंशी, किरण सोनटक्के, गणेश दरोडे, मोसिन पठाण आदींसह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रमुख मागण्या. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा.

ब्लॅकलिस्टमध्ये असलेल्या कंपन्या किंवा त्यांच्या संचालकांशी संबंधित संस्थांना परीक्षा घेण्याचे कोणतेही काम देऊ नये. नॅशनल टेस्टिंग एजन्सी () आणि संबंधित विभागाची जबाबदारी निश्चित करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी. ऑनलाइन परीक्षा व्यवस्थेतील सर्व त्रुटी दूर करून पारदर्शक व विश्वासार्ह परीक्षा प्रणाली लागू करावी. महाराष्ट्रातील स्पर्धा परीक्षा कायमस्वरूपी ऑफलाइन पद्धतीने घेण्यात याव्यात. पोलीस भरती प्रक्रियेतील कथित अन्याय व त्रुटी दूर करून पात्र उमेदवारांना त्वरित न्याय द्यावा.

विद्यार्थी व युवकांच्या प्रलंबित प्रश्नांवर सरकारने तातडीने ठोस आणि सकारात्मक निर्णय जाहीर करावेत.

वरील सर्व मागण्यांवर तातडीने निर्णय न घेतल्यास राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला.

## दरोड्याच्या तयारीतील तिघांची टोळी एमडी ड्रग्जसह गजाआड

नायब तहसीलदार गणेश भानवसे व पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या उपस्थितीत कारची झडती घेतली असता, ३१ लाख ४ हजार ४०० रुपये किमतीचे १५० ग्रॅम मॅफेड्रॉन (एमडी) ड्रग्ज, प्लास्टिक पिस्तूल (लायटर), रबरी मुखवटे, हँडग्लोव्हज, चाकू, दोरी व गाडीच्या नंबर प्लेट्स असा ऐवज हस्तगत करण्यात आला. पोलिसांनी जिशान शौकत सय्यद (वय २६, रा. मुकुंदनगर), रिहान जावेद शेख (वय २६, रा. मुकुंदनगर) व वसिम खलिल बागवान (वय ३८, रा. पिंजार गल्ली) यांना अटक केली, तर त्यांचे साथीदार जमीर निसार शेख व एका अनोळखी पळून गेले. आरोपींवर दरोड्याची तयारी व अंमली पदार्थ तस्करी या प्रकरणी बीएनएस आणि एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नगरपरिषदेच्या माध्यमातून कठोर भूमिका घेणार - उपनगराध्यक्ष अभय शेळके

ही पालकांच्या पाठबळावर मोठ्या प्रमाणावर पैसे गोळा करतात हा प्रकार आता खपवून घेतला जाणार नाही अशा प्रवृत्तीला पाठबळ देणारा कोणी कितीही मोठा असला तरी त्याचा देखील वेळ प्रसंगी आपण बंदोबस्त करू हे सांगताना ज्यावेळेस घटना घडली त्यावेळी मदतीसाठी व्यवसायिकांनी दुकानदारांनी पुढे जाण्याची गरज होती मात्र तसे घडलेले दिसून येत नाही त्यामुळे एक निष्पाप महिलेला आपला जीव गमवावा लागला एक कुटुंब उद्ध्वस्त झाले आहे जवळच मंदिर सुरक्षा रक्षक व पोलीस यांनी या प्रसंगी कोणती भूमिका घेतली याकडे देखील वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे लक्ष वेधल्याचे सांगितले.

## लोखंडी पूल व नवीन पुलावरील बंद स्ट्रीट लाईट्स तात्काळ सुरू करा

करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर बंद पडलेल्या स्ट्रीट लाईट्सची तात्काळ दुरुस्ती करून त्या पूर्ववत सुरू करण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या समस्या उद्भवू नयेत आणि संपूर्ण परिसर अधिक प्रकाशमान व्हावा यासाठी जुन्या दिव्यांच्या जागी आधुनिक, ऊर्जा कार्यक्षम व अधिक उजेड देणाऱ्या एलईडी स्ट्रीट लाईट्स बसविण्याची मागणीही नगरसेवक मयूर बांगरे यांनी केली आहे.

या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित विभागाला तातडीने आवश्यक सूचना देत नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, अशी अपेक्षा नागरिकांसह नगरसेवक मयूर बांगरे यांनी व्यक्त केली आहे.

## हातात लोखंडी कोयता घेवुन दहशत निर्माण करणारे आरोपीनां कोतवाली पोलीसांनी केले जेरबंद

दिपक रोहकले, सत्यम शिंदे, रमेश शिंदे, अतुल लाटे, संकेत धिवर, शिरीष तरटे, दत्तात्रय कोतकर, अतुल काजळे, अमोल गाडे,महेश पवार, सचीन लोळगे, विजय ठोंबरे, सुरज कदम महेकॉ रोहीणी दरंदल, मपोकॉ पल्लवी रोहकले यांचे पथकाने केली आहे.